# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.10.2025** **वार:गुरुवार**

---

1. नक्षलवादी चळवळीचा वरिष्ठ नेता भूपतीसह 61 नक्षलवाद्यांचं गडचिरोलीत आत्मसमर्पण
2. देशातून माओवाद पूर्णपणे हद्दपार होणार असल्याचा मुख्यमंत्र्यांचा विश्वास
3. बहुप्रतीक्षित सोलापूर-मुंबई विमानसेवेला प्रारंभ
4. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आणि
5. माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनि मित्त वाचन प्रेरणा दिवस राज्यात विविध उपक्रमांनी साजरा

**आत्मसमर्पण-गडचिरोली**

नक्षल चळवळीतला मोठा नेता, माओवाद्यांची केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेला मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह 61 नक्षलवाद्यांनी काल गडचिरोलीत आत्मसमर्पण केलं. ऐकू या विषयीचा वृत्तांत....

**माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य तथा पॉलिटब्युरो सदस्य मल्लजुला वेणूगोपाल उर्फ भूपती आणि दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या सदस्यांसह एकूण एकसष्ठ नक्षल्यांनी गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. भूपती सारख्या नक्षल चळवळीला बौद्धिक ताकद देणाऱ्या मोठ्या कॅडेट आत्मसमर्पण करणं हे ऐतिहासिक गोष्ट आहे त्याच्या आत्मसमर्पणामुळे माओवादी चळवळीच्या समाप्तीचा चॅप्टर लिहिण्याची सुरुवात गडचिरोलीतून झाल्याचा अभिमान आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले....**

**माओवाद हा शंभर टक्के हद्दपार होणार अशा प्रकारच्या परिस्थितीत आपण पोहोचलेलो आहोत. आणि या लढाईच नेतृत्व गडचिरोली करते आहे कारण आता जी काही या ठिकाणी भूपतीनी भूमिका घेतली आणि गेले महिनाभर सातत्याने आपल्या फोर्सेस च्या संपर्कामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे निगोशिएशन, हे त्या ठिकाणी चालले होते, आणि त्या अंतर्गत त्यांनी घेतलेल्या जाहीर भूमिकेमुळे आज साठ लोक तर या ठिकाणी आलेच आहेत. पण आता उरलेलं जे कैडर आहे. जे छत्तीसगडमध्ये आहे त्यांच्यामध्येही आता मोठ्या प्रमाणात ही भावना तयार झाली आहे. की आता आपण आयडॉलॉजिकल व हारलेलो आहे. आपल्याला भारतीय संविधान हेच या ठिकाणी न्याय देऊ शकत अशा प्रकारची त्यांची भावना झाल्यामुळे, मला विश्वास आहे की पुढच्या काही दिवसात छत्तीसगड मोठ्या प्रमाणात शंभर दीडशेड केडर हा आत्मसम, बाजूला त आणि हा संपूर्ण तथाकथित तत्कालीन जो रेड कॉरिडॉर होता या रेड कॉरिडॉर मधलं आता संपूर्ण माओवाद हा संपुष्टात येईल आणि त्याची सुरुवात ही गडचिरोलीने आणि महाराष्ट्राने केली हा माझ्याकरता अतिशय अभिमान आहे. आणि स्वाभिमानाचा मुद्दा आहे.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात नक्षलवादाचा समूळ उच्चाटन करण्याची रणनीती यशस्वी ठरत आहे असं सांगून मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलीस दलाला एक कोटी रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं आकाशवाणीच्या बातम्यांसाठी गडचिलीहून जयंत निमगडे.**

**सोलापूर विमानसेवा**

सोलापूर-मुंबई विमानसेवेमुळे सोलापूर परिसरातील औद्योगिक विकासाला गती आणि पर्यटनक्षेत्राला चालना मिळून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. सोलापूर-मुंबई विमानसेवेचा प्रारंभ केल्यानंतर ते काल बोलत होते. हवाई सेवेची उपलब्धता पाहून उद्योजक गुंतवणुकीचा निर्णय घेतात, त्यामुळे जगाच्या बाजाराशी जोडले जात असतांना विमानसेवा महत्वाची असल्याचं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**सोलापूरला आता आम्ही जगाशी जोडतो आहोत या ठिकाणी पंढरपूर असेल विठ्ठला.चं दर्शन घेणारे, आई तुळजाभवानीचं दर्शन घेणारे सिद्धरामेश्वरांचं दर्शन घेणारे असे सगळे भाविक आहेत त्यांच्याकरता ही एक मोठी सेवा आता या ठिकाणी उपलब्ध होणार आहे.**

**आणि देशाच्या आणि जगाच्या मॅपवर आता सोलापूरची कनेक्टिव्हिटी आलेली आहे ही मला असं वाटतं सोलापूरकरांकरता अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.**

देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील सर्वाधिक विमानतळ कार्यान्वित असून, राज्यातील विमानसेवेचा विस्तार करण्यासाठी आवश्यक सुविधांचा विकास करण्यात येत असल्याचं केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी नमूद केलं.

जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि पूरग्रस्त भागातल्या लाडक्या बहिणींना मोफत अन्नधान्य आणि दिवाळी किट देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील श्रीपूर इथं कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना परिसरात सुधाकरपंत परिचारक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण, आणि कारखान्याच्या विस्तारीकरण तसंच पोटॅश निर्मिती प्रकल्पाचा शुभारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.

**संरक्षणमंत्री**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत, काल रात्री त्यांचं पुण्यात आगमन झालं. आज सकाळी सिंबायोसिस कौशल्य विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसंच डीआरडीओ इथं संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक होणार आहे. त्यानंतर ते नाशिकला रवाना होती. नाशिकमध्ये स्वदेशी बनावटीच्या 'तेजस एमके-वन ए' या लढाऊ विमानाच्या उत्पादनाच्या तिसऱ्या टप्प्याचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल, तसंच ओझर मिनी स्मार्ट टाऊनशिपचं उद्घाटनही राजनाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे.

**निवडणूक**

मतदारयादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी मागणी महाविकास आघाडी आणि इतर पक्षांनी काल राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. विरोधी पक्षांच्या प्रतिनिधीमंडळानं काल मुंबईत मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम आणि राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली.

**GST सुधारणा**

देशात लागू झालेल्या नवीन GST सुधारणांमुळे औषधे, तसंच दैनंदिन वापरातील वस्तूंच्या किंमती कमी झाल्या असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत पुण्यातील पुष्कर तुळजापूरकर यांची ही प्रतिक्रिया.....

**अलीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी औषधावरील जीएसटी कमी करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे, त्याचा खरोखरच मोठा फायदा सर्वसामान्य लोकांना झालेला आहे. काही औषधं आधी घेताना बिल पाहून थोडंसं अवघडल्यासारखं व्हायचं पण आता जीएसटी कमी झाल्यावर किमती थोड्या कमी झाल्या आहेत आणि तेवढाच दिलासा मिळतोय सर्वसामान्यांच्या खिशाचा विचार करून घेतलेला हा निर्णय मनापासून प्रशंसनीय आहे. म्हणून मी नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो.**

**वाचन प्रेरणा दिन**

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती काल राज्यात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय यांच्या वतीनं मंत्रालयात ग्रंथ प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. या ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केलं.

वाचनातून सृजनशीलता, निर्माण होऊन नवी प्रेरणा मिळते, म्हणून प्रत्येकाने दररोज किमान एक तास वाचनासाठी द्यावा, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं. सांगलीत वाचन प्रेरणा दिनानिमित्त ऐतिहासिक आणि संदर्भ मूल्य असलेल्या ग्रंथांचं वैविध्यपूर्ण प्रदर्शन तसंच सलग 12 तास वाचनाचा उपक्रम राबवण्यात आला.

नाशिकमध्ये वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पिंपरी चिंचवडमध्येही विविध उपक्रमांच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला. जळगावमध्ये काल झालेल्या महावाचन अभियानात जळगावकरांनी सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत वाचन केलं. शहरातील मान्यवरांनी वाचन करून या अभियानाचा शुभारंभ केला.

**राष्ट्रीय पोषण माह**

राष्ट्रीय पोषण महिन्यानिमित्त केंद्रीय संचार ब्युरोतर्फे पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात बहुमाध्यम प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. सरकारी योजना घरोघरी पोहचविण्यासाठी आणि पोषण अभियान यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्त्या मोलाचे कार्य करतात, असं भोरचे तहसिलदार राजेंद्र नजन यांनी यावेळी सांगितलं. कर्करोगासारख्या रोगांपासून दूर राहण्यासाठी नैसर्गिकरित्या भाजीपाला पिकवण्याची आवश्यकता असल्याचं तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभय तिडके यावेळी म्हणाले. हे तीन दिवसीय प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन योग्य आहार आणि त्यातून जपले जाणारे आरोग्य याविषयीची माहिती घ्यावी, असे आवाहन केंद्रीय संचार ब्युरोनं केलं आहे.

**निधन-पालघर**

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाच्या प्रभारी उपसंचालक आणि लेखिका अर्चना गाडेकर -शंभरकर यांचं काल मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं, त्या 52 वर्षांच्या होत्या. मूळच्याचंद्रपूरच्या असलेल्या अर्चना शंभरकर यांनी एक कादंबरी आणि एका लघुकथा संग्रहाचं लेखनकेलं आहे.

**पाऊस**

रत्नागिरीत काल दुपारी ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस झाला. गेले काही दिवस कडक ऊन पडत असल्यामुळे वातावरणातला गारवा कमी होऊन उकाडा वाढला होता. त्यामुळे भातकापणीला वेग आला होता. सांगली जिल्ह्यातल्या मिरज, तासगाव, कवठेमहांकाळ आणि वाळवा तालुक्यातही मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. दुपारी आलेल्या पावसामुळ जनजीवन विस्कळीत झालं. दिवाळी साहित्य विक्रेत्यांची तारांबळ उडाली. पुण्यातही काल संध्याकाळी पावसानं हजेरी लावली. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेत पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली.

**हवामान**

राज्याच्या काही भागात तापमानात लक्षणीय वाढ झाली असली तरी काही भागात काल जोरदार पावसानं हजेरी लावली. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी आजही पावसाची शक्यता हवामान विभागांम वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार